# प्रबोधन
गोरेगाव

## ३२ वा वार्षिक अहवाल
## २००३ - २००४




जनतेच्या सेवेत लवकरच रुजू होत असलेली प्रबोधन रक्तपेढी

# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४.

दूरध्वनी क्र. २८७३ ४८६९ / २८७२ ६२७८

**www. prabodhan.org**

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn.No.Mum.46/72 GB BSD)

मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn.No. F 2502 Mum.)

आयकर कलम ८०-ग खाली देणग्या करमुक्त

## पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

२००३-२००४

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | **डॉ. मनोहर अद्वानकर,** एम.एस.सी., पीएच.डी. |
| उपाध्यक्ष | : | **ॲड्. विकास रेळे,** बी.ए. एलएल.बी. |
| | | **श्री. सुरेश चव्हाण,** बी.ए. |

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | **श्री. मिलिंद डुंबरे,** बी.कॉम. |
| प्रमुख कार्यवाह | : | **श्री. शशांक कामत,** बी.कॉम. |
| सहकार्यवाह | : | **श्री. सुनिल कविश्वर** |
| | | **श्री. भूषण काळे** |
| खजिनदार | : | **श्री. नितीन शिंदे,** बी.ए. डी.जे. |

## सभासद

**श्री. चंद्रकांत देऊलकर**
**श्री. जेकब जॉन्सन**
**श्री. श्रीनिवास शिरसेकर,** जी.डी. आर्टस्
**श्री. प्रसाद भायदे**
**श्री. गोविंद येतयेकर,** बी.कॉम.
**श्री. अनिल देसाई**
**श्री चाको मॅथ्यू**
**श्री. विनोद निंबाळकर**
**श्री. चंद्रकांत पोतदार**
**श्री. रमेश ईस्वलकर**

## अंतर्गत हिशेबतपासनीस

**श्री. विवेक जोशी,** बी.कॉम., एफ.सी.ए.

## सनदी लेखापाल

**श्री. जयंत आपटे,** बी.कॉम. एफ.सी.ए

# प्रबोधन गोरेगाव

## ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २ ऑक्टोबर, २००४ रोजी सकाळी १०.०० वा. प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजुरी देणे.

३. २००३-२००४ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेबतपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.

४. नवीन वर्षाकरिता २००४-२००५ घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा).

५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेबतपासनीस व सरकारमान्य हिशेबतपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून,

**मिलिंद डुंबरे**
कार्याध्यक्ष

दि. १७ सप्टेंबर २००४ **शशांक कामत**
गोरेगाव, मुंबई. प्रमुख कार्यवाह

---

१. संस्थेचा जमाखर्च प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २३ ते २५ सप्टेंबर २००४ पर्यंत संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणत्याही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक दि. २७ सप्टेंबर २००४ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

२. गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

३. निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. २७ सप्टेंबर २००४ पर्यंत संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे.

# प्रबोधन दै. सामना वक्तृत्व स्पर्धा

दूरचित्रवाणी, कॉम्प्युटर, इंटरनेट व इतर माध्यमांच्या आक्रमणामुळे सध्या विद्यार्थ्यांची वक्तृत्वाकडे ओढ कमी आहे. विद्यार्थ्यांची या क्षेत्राकडे ओढ वाढविण्यासाठी संस्थेने या स्पर्धेच्या आयोजनातील सातत्य टिकवून धरले आहे, ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे.

महाराष्ट्रातील व विशेषतः बृहन्मुंबईतील मराठी माध्यमांच्या शाळातील शिक्षकांनी व विद्यार्थ्यांच्या पालकांनी अधिकाधिक मुलांना या स्पर्धेत भाग घेण्यास उद्युक्त करून स्पर्धा अधिकाधिक मोठया प्रमाणावर आयोजित करण्यासाठी संस्थेच्या प्रयत्नांना हातभार लावाव अशी कळकळीची विनंती संस्था करीत आहे. या स्पर्धेत मराठी प्रेमी रसिकांचे सहकार्य नेहमीच मिळत आहे, ही आनंदाची बाब आहे.

१९९७ सालापासून ही दैनिक सामनाच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. दै. सामनाच्या सक्रीय सहभागामुळे या वक्तृत्व स्पर्धेस फार मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. सदर स्पर्धेची रोख पारितोषिक गोरेगाव स्पोर्टस् क्लबने पुरस्कृत केली होती. संस्था **विश्वस्त दै. सामना, डॉ. शाम अग्रवाल, अध्यक्ष - गोरेगाव स्पोर्टस् क्लब** यांची ऋणी आहे.

संस्थेने स्थापनेपासून सुरू केलेल्या या स्पर्धेचे यंदाचे ३१ वे वर्ष आहे. यंदा ही स्पर्धा रविवार दि. २८ सप्टेंबर २००३ रोजी प्रबोधन क्रीडाभवन येथे अतिशय शिस्तबद्ध वातावरणात आयोजित करण्यात आली. स्पर्धेत यावर्षी राज्यातील ३२ शालेय व ४० महाविद्यालयीन संघानी भाग घेतला होता. मुंबई बाहेरील स्पर्धकांची निवास व भोजन व्यवस्था विनामूल्य करण्यात आली व त्यांच्या जाण्या-येण्याच्या सवलतीचा प्रवास खर्चाची व्यवस्था संस्थेने केली.

३१ व्या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षिस समारंभ त्याच दिवशी संध्याकाळी **श्री. संजीव साबडे**, महानगर संपादक, महाराष्ट्र टाइम्स यांच्या हस्ते पार पडला.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. सुर्यकांत मालसुरे व श्रीमती वैभवी नरे (शालेय गट) तसेच श्री. विलास पवार, श्री. राजीव परूळेकर व श्रीमती. मनिषा रावराणे (महाविद्यालयीन गट) हे उपस्थित होते.

शालेय गटातील कै. शिक्षणमहर्षी दादासाहेब रेगे स्मृति फिरता चषक ठाण्याच्या सर सरस्वती सेकंडरी स्कूलने पटकविला तर महाविद्यालयीन गटासाठी असलेला कै. गोविंदराव कुलकर्णी स्मृति प्रबोधन फिरता चषक पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजने पटकाविला.

(सविस्तर निकाल परिशिष्ट **'अ'** मध्ये पाहावा.)

सुमतीभाई शहा आयुर्वेद महाविद्यालय, वाघाली आयुर्वेद या प्रमुख महाविद्यालयांचा समावेश होता. **सुप्रसिद्ध वैद्य पी. वाय. खडीवाले** यांच्या पुढाकाराने वरील महाविद्यालय प्रदर्शनात हर्बल जीवनशैली याची माहिती लोकांना दिली.

हर्बल वर्ल्ड २००३ च्या निमित्ताने नोव्हेंबर मध्ये मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बी.पी.टी. गार्डन कुलाबा, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी व माहिम नेचर पार्क या पाच ठिकाणी निसर्ग सफरीचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईतील निसर्ग उद्यानात असलेल्या झाडांची, रोपांची माहित करून देणे व त्याचबरोबर औषधी वनस्पतींची ओळख करून देणे, त्यांचे फायदे-तोटे व उपचार पद्धती सांगणे असे या निसर्ग सफरीचे स्वरूप होते. या निसर्ग सफरीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रो. एम.आर. अल्मेडा, प्रो. सी.एम.लड्डू, डॉ. एम.एन.शिपी, डॉ. माया चेंदूटकर, डॉ. नमिता शिरोडकर, डॉ. सुच्चेंद्रा दत्त आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या प्रदर्शनात **'देवराई'** संदर्भात एक माहितीपूर्ण लघुपट प्रबोधन गोरेगावने खास तयार केला होता. **'देवराई'** या सुमारे २० मिनिटे लघुपटामध्ये महाराष्ट्रातील सुमारे १० निवडक देवराईची बहुमूल्य माहिती संग्रहीत करण्यात आली होती. सुप्रसिद्ध निवेदक श्री. प्रदीप भिडे यांनी या लघुपटासाठी निवेदकाची भूमिका पार पाडली. या संकल्पनेला रामभाऊ म्हाळगी प्रबोधनीचे संचालक डॉ. संजय देशमुख, श्री. आनंद भारती यांचे मौलिक सहकार्य लाभले.

प्रदर्शना निमित्त आयोजित करण्यात आलेल्या शास्त्रीय व्याख्यानात प्रसंगी पर्यायी व पारंपारिक उपचार पद्धती आणि पौष्टीक औषधे व नैसर्गिक सौंदर्य या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. देशभरातील नामवंत शास्त्रज्ञ व तज्ज्ञ तसेच टोकियो विद्यापीठाच्या मिदोरी हिरमान्शू या परिसंवादात व्याख्याते म्हणून आवर्जून उपस्थित होत्या. तसेच प्रदर्शनाच्या निमित्ताने लोकोपयोगी व्याख्यानमालेचे ही आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनाची सांगता अणू उर्जा आयोगाचे अध्यक्ष **डॉ. अनिल काकोडकर** यांच्या उपस्थितीत पार पाडले. देशाच्या अर्थक्रांतीत हर्बलचा मोठा वाटा असून हा देशाचा अनमोल वारसा जतन करण्याचे काम खेडेगावात, डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी जमातीकडेच दिले पाहिजे, असे सांगून जागतिकरण्याच्या माध्यमातून औषधी वनस्पतींचे पेटंट मिळविण्यासाठी आपल्या देशात ठोस प्रयत्न केले पाहिजेत, असे मत डॉ. काकोडकर यांनी व्यक्त केले.

# २६ व्या क्रीडामहोत्सवाचा निकाल (परिशिष्ट - ब)

**प्रबोधन मानचिन्ह (सर्वोत्कृष्ट संघ) :**
मानचिन्ह पुरस्कर्ते - श्री. सुरेश वासुदेव सैतवडेकर.
कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर प्रबोधन स्मृतिचिन्ह,
शाळा : अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव.

**ॲथलेटिक्स स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निवाळकर
कै. शशिकला सखाराम निवाळकर स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : चिल्ड्रन ॲकॅडमी, शीतल नगर, कांदिवली.

**ॲथलेटिक्स स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.एस.एन.बाळकृष्ण
कै.एस.एन.सुब्रमणियन् स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : डीव्हाइन चाईल्ड हायस्कूल, अंधेरी.

**कबड्डी मुले विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश टियर मार्ट
कै. आसाराम गायकवाड स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : साने गुरूजी विद्यामंदिर, सांताक्रुझ.

**कबड्डी मुले उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश एक्सपोर्ट, गोरेगाव
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे.

**कबड्डी मुली विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स जे.बी.सावंत इंजिनिअरिंग प्रा.लि.
शाळा : अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव.

**कबड्डी मुली उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश प्लास्टिक वर्क्स
शाळा : श्रमिक विद्यालय, जोगेश्वरी.

**टेनिस स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.व सौ. रामाराव
त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : एल.आर.एस.एम. विशजी ॲकॅडमी.

**टेनिस स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. व सौ. रामाराव
त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : १) जशुटबेन एम.एल.स्कूल, खार
२) सेंट डॉमिनिक सेवियो हायस्कूल.

**खो-खो मुले विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : आर.एस.जंगम

**खो-खो मुले उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : तुलसीदास खिमजी स्मृतीप्रीत्यर्थ
शाळा : सुविद्यालय शाळा, बोरिवली

**खो-खो मुली विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.एन.बी.पाटील
मंदार पाटील स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : परांजपे विद्यालय, अंधेरी.

**खो-खो मुली उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : सौ. आशा प्रभाकर ठाकूर
शाळा : अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव

**संचलन स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : एन.बी.पाटील
कै. बाळकृष्ण पाटील स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : सेंट लॉरेन्स हायस्कूल, बोरिवली

**संचलन स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गोरेगाव स्पोर्टस् क्लब
शाळा : सेंट ॲनेक्स हायस्कूल, बोरिवली.

**लोकनृत्य स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स हॉटेल प्रकाश, गोरेगाव
शाळा : चिल्ड्रन्स ॲकॅडमी, आशानगर, कांदिवली.

**लोकनृत्य स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आशीर्वाद स्टोर्स, गोरेगाव
शाळा : चिल्ड्रन्स ॲकॅडमी, मालाड

**मल्लखांब स्पर्धा विजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.विनोद निबाळकर
कै. सखाराम निबाळकर स्मृतिप्रीत्यर्थ,
शाळा : बाल विकास विद्यामंदिर, जोगेश्वरी.

**मल्लखांब स्पर्धा उपविजेता संघ :**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. नितीन शिंदे
कै. डॉ. अनंतराव शिंदे स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : संस्कारधाम हिअरिंग एम्पाअर स्कूल, गोरेगाव.

---

**उत्कृष्ट ॲथलेटिक्स (मुलगी)**
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. जोगिंदर सिंग
रिया वालीवाला, शाळा : डिव्हाईन चाईल्ड हायस्कूल, अंधेरी (पू.)

**उत्कृष्ट ॲथलेटिक्स (मुलगा)**
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आर्चाडियल क्लासेस प्रा.लि.
अमन सिंग, शाळा : चिल्ड्रन्स ॲकॅडमी, शीतल नगर, कांदिवली

ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम

# प्रबोधन
गोरेगाव

**प्रबोधन क्रीडाभवन,** प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,
गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ दूरध्वनी : २८७३ ४८ ६९, २८७२ ६२ ७८
www.prabodhan.org

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून

## प्रबोधन क्रीडाभवन

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलामध्ये
क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, खो-खो, कराटे व
नृत्य यांचे तज्ज्ञांकडून प्रशिक्षण उपलब्ध
तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थसेंटर

---

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

## प्रबोधन जॉगर्स पार्क

टेनिस प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली **टेनिस ॲकॅडेमी** आणि सभोवताली सुंदर वनराई असलेला **जॉगिंग ट्रॅक**

---

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

## प्रबोधनकार ठाकरे वाचनालय

प्रत्येक घरासाठी, घरातील प्रत्येकासाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी
ज्ञान-मनोरंजनाचा मेवा

**प्रबोधन जॉगर्स पार्क :** सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. १७,
गोरेगाव (प.), मुंबई - ४०० ०६२. दूरध्वनी : २८७८ २३ २४